राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज
अभियान राबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास विभाग**
**शासन निर्णय क्र:-मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२,E-११२३०५७/यो-११**
**बांधकाम भवन ,२५ मर्झबान पथ फोर्ट ,मुंबई**
**दि. ०६ ऑगस्ट, २०२५**

**संदर्भ :- मा.मंत्रिमंडळाची दि.२९.०७.२०२५ रोजी झालेली बैठक.**

**प्रस्तावना:-**

संयुक्त राष्ट्र संघाने "शाश्वत विकासासाठी जागतिक परिवर्तन कार्यक्रम २०३०" जाहीर केला असून "सर्वाना सोबत घेऊन चला" (Leave no one behind) हा या जागतिक कार्यक्रमाचा गाभा आहे. सयुंक्त राष्ट्र संघाने १७ शाश्वत विकास ध्येये व त्या अंतर्गत १६९ लक्ष्ये/ उद्दिष्टे जाहीर केली असून, त्यांची अंमलबजावणी दि. ०१ जानेवारी २०१६ पासून भारतात सुरु करण्यात आली आहे. भारत सरकारच्या पंचायत राज विभागाने शाश्वत विकासाच्या ध्येयांच्या स्थानिकीकरणासाठी शाश्वत विकासाच्या ध्येयांचे नवरत्न संकल्पनेमध्ये रुपांतर केले असून, त्या अनुषंगाने ग्रामीण विकासासाठी शासनाचे विविध विभाग मार्गक्रमण करीत आहेत.

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे मोठे योगदान असुन त्रिस्तरीय पंचायत राज संस्थेमार्फत ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे हे मुख्य ध्येय आहे. राज्यातील विकासाच्या बहुतांश योजना पंचायत राज संस्थांमार्फत राबविल्या जातात. त्याअनुषंगाने ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांना कामगिरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविणे आवश्यक आहे. ग्राम विकास विभाग व शासनाच्या इतर विभागांच्या विविध योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जातात. सदर योजनांची प्रभावी व जलदगतीने अंमलबजावणी करून, त्यांचा लाभ ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, यातून ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावणे, ग्रामपंचायती मध्ये लोकसहभागाची चळवळ निर्माण करणे, ग्रामीण नागरिकांना सुलभ रीतीने सेवा देणे, महाराष्ट्रातील थोर संत परंपरेचा सहभाग घेणे, आरोग्य , शिक्षण, उपजीविका, सामाजिक न्याय या मुख्य क्षेत्रामध्ये ग्रामपंचायतीचा सहभाग वाढवून पंचायत राज संस्था गतिमान करणे या संकल्पनेतून "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-**

ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रामुख्याने काम करणाऱ्या ग्रामपंचायतीस, कामगिरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविण्याकरिता, उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य अशा चार स्तरांवर प्रोत्साहन देण्याकरिता **"मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान "** हे पुरस्कार अभियान राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

**२. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचे ७ मुख्य घटक असून ते खालीलप्रमाणे आहेत-:**

| **अभियानाचे मुख्य घटक तथा विषय** | |
|---|---|
| १ | सुशासन युक्त पंचायत (लोकाभिमुख सक्षम पंचायत प्रशासन )Governance )तयार करणे) |
| २ | सक्षम पंचायत (स्वनिधी, CSR व लोकवर्गणीतून पंचायत राज संस्थांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे) |
| ३ | जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव निर्माण करणे |
| ४ | मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे |
| ५ | गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण करणे |
| ६ | उपजिविका विकास,सामाजिक न्याय |
| ७ | लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे |

अभियान कालावधीत वरील घटकांवर झालेल्या कामगिरीच्या आधारे गुणांकन करून पुरस्कारासाठी निवड केली जाईल. **गुणांकनाचा तपशील सोबत जोडलेल्या परिशिष्ट “अ” प्रमाणे आहे.**

३. **अभियानाचा कालावधी -:**

अभियानाचा कालावधी दिनांक १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर असा राहिल.

**४. अभियानाची पूर्व तयारी खालीलप्रमाणे करण्यात येईल:-**

१. दिनांक १ ऑगस्टपासून अभियानाची पूर्व तयारी करणे (राज्य,विभाग,जिल्हा व तालुका स्तरावर बैठका)
२. तालुका व जिल्हा स्तरावर प्रशिक्षण ,ग्रामपंचायतीना प्रशिक्षण
३. ग्रामस्तरावर अभियानाची पूर्वतयारी ,तालुका स्तरीय अधिकाऱ्यांना ग्रामपंचायतीकडे संपर्क अधिकारी म्हणून नेमणे.
४. दि.१७ सप्टेंबर रोजी ग्रामसभा व ग्रामस्तरीय समितीची स्थापना तसेच विषयवार लहान गट स्थापन करणे.
५. अभियान कालावधीत सर्व मुद्द्यावर कार्यवाही करणे व दैनंदिन अहवाल App वर पाठवणे.
६. ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणे .



Scanned with OKEN Scanner

**५. "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या" अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरावर संनियंत्रण समिती स्थापन करण्यात येत आहे:-**

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज विभाग | अध्यक्ष |
| २ | मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज विभाग | उपाध्यक्ष |
| ३ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, पाणीपुरवठा विभाग | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, कृषि विभाग | सदस्य |
| ५ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | सदस्य |
| ६ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, महिला व बाल विकास विभाग | सदस्य |
| ७ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, शालेय शिक्षण विभाग | सदस्य |
| ८ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मृद व जलसंधारण विभाग | सदस्य |
| ९ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, कौशल्य विकास, रोजगार, उद्योग व संशोधन | सदस्य |
| १० | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, सामाजिक न्याय विभाग | सदस्य |
| ११ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, रोजगार हमी फलोत्पादन विभाग | सदस्य |
| १२ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, आरोग्य विभाग | सदस्य |
| १३ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, महसूल विभाग | सदस्य |
| १४ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग | सदस्य सचिव |
| १५ | मा.अध्यक्ष आदर्श गाव संकल्पना समिती महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| १६ | दोन निमंत्रित सदस्य (अध्यक्ष यांनी निवड केलेल्या ग्रामीण विकासात प्रभावशाली काम करणाऱ्या व्यक्ती ) | सदस्य |

उपरोक्त समितीस अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करिता गुणांकन, अभियान कालावधी, पुरस्काराची रक्कम व इतर अनुषंगीक बाबींमध्ये आवश्यकतेनुसार व निधी उपलब्धतेनुसार बदल करण्याचे अधिकार राहतील.



Scanned with OKEN Scanner

६. या अभियानामध्ये ग्रामपंचायतीची महत्वपूर्ण भूमिका असल्याने, ग्रामपंचायत स्तरावर प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी सरपंच /प्रशासक यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल. सदर समिती मध्ये ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी व गाव पातळीवरील सर्व अधिकारी /कर्मचारी सदस्य म्हणून कार्यरत राहतील .समितीचे सदस्य सचिव म्हणून "ग्रामपंचायत अधिकारी" हे काम पाहतील. उद्दिष्टांची प्रभावी अंमलबजावणी करून जास्तीत जास्त गुणांकन मिळविणे, हे या समितीचे महत्वाचे कार्य असणार आहे.

७. अभियान अंतर्गत निर्देशकांची काटेकोरपणे अंमलबजावणी साठी विभाग, जिल्हा व पंचायत समिती स्तरावर सनियंत्रण व मुल्यमापन यंत्रणा समिती नियोजन करेल .

अ) विभागीय आयुक्त हे विभागातील प्रत्येक जिल्ह्यासाठी, अपर आयुक्त/ उपायुक्त/ उपसंचालक/ सहआयुक्त या दर्जाच्या अधिकाऱ्यांची पालक अधिकारी म्हणून नेमणूक करतील.

ब) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी जिल्हा परिषद, विभाग प्रमुख यांची पालक अधिकारी नेमणूक करतील .

क) गटविकास अधिकारी, पंचायत समिती हे त्यांच्या तालुक्यातील जिल्हा परिषद मतदारसंघा साठी, पंचायत समिती मधील विभाग प्रमुख यांची संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक करतील.

८. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत निवडीची कार्यपद्धती खालीलप्रमाणे आहे :-

**"मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" अंतर्गत तालुका, जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर तपासणी करून ग्रामपंचायतीची पुरस्काराकरिता निवड करण्यासाठी तालुका, जिल्हा, विभाग व राज्य स्तरावरील निवड/मुल्यमापन समिती सोबत जोडलेल्या परिशिष्ट "ब" प्रमाणे आहेत.**

ग्रामपंचायतींकडून प्राप्त स्वमुल्यांकन प्रस्तावांचे तालुका स्तरावरील समितीकडून मुल्यमापन करून, तालुकास्तरावरील सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची तालुकास्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून निवड करण्यात येईल. तसेच २ ग्रामपंचायतींची विशेष पुरस्कारासाठी निवड केली जाईल.

जिल्ह्यातील तालुकास्तरावरील अत्यत्कृष्ट ३ ग्रामपंचायतींचे जिल्हास्तरीय समितीमार्फत मुल्यमापन करून, सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची जिल्हास्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून निवड करण्यात येईल.

राज्यातील ६ महसुली विभागातील जिल्हास्तरावरील अत्यत्कृष्ट प्रत्येकी प्रथम २ ग्रामपंचायतींचे विभागस्तरीय समितीमार्फत मुल्यमापन करून, सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची विभागस्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून निवड करण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

या विभागस्तरावरील अत्यत्कृष्ट प्रथम २ ग्रामपंचायतींचे राज्यस्तरीय समितीमार्फत मुल्यमापन करून, सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची राज्यस्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून निवड करण्यात येईल.

या सर्व स्तरांवरचा मुल्यमापन कालावधी व प्रस्ताव सादर करण्याची प्रत्येक आर्थिक वर्षातील अंतिम तारीख खालीलप्रमाणे आहे -:

मूल्यमापन :- तालुका स्तरीय मूल्यमापन :- दि.११ जानेवारी ते दि.२६ जानेवारी
जिल्हा स्तरीय मूल्यमापन :- दि.२८ जानेवारी ते दि.१५ फेब्रुवारी
विभाग स्तरीय मूल्यमापन :- दि.१७ फेब्रुवारी ते दि.२७ फेब्रुवारी
राज्य स्तरीय मूल्यमापन :- संपूर्ण मार्च महिना

| अ.क्र. | मूल्यमापन करणारी समिती | मूल्यमापन/निवड प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत स्तरावरून तालुका स्तरीय समिती कडे अर्ज स्वमुल्यांकन करून सादर करणे | दि.१० जानेवारी |
| २ | जिल्हास्तरीय समिती | दि २७ जानेवारी |
| ३ | विभाग स्तरीय समिती | दि.१६ फेब्रुवारी |
| ४ | राज्यस्तरीय समिती | दि.२८ फेब्रुवारी |

(१) ज्या ग्रामपंचायतींची वरिष्ठ स्तरावरील पुरस्कारासाठी निवड झाली असेल, त्या ग्रामपंचायतीला वगळून, पुरस्कारासाठीच्या एकूण गुणांकनामध्ये, त्या नंतरचे गुणांकन असणाऱ्या ग्रामपंचायती निवडीस पात्र राहतील. ही पद्धत राज्य, महसूली विभाग, जिल्हा व तालुका या प्रत्येक स्तरावर अवलंबिली जाईल.

सदर अभियानांतर्गत जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी ही उस्फुर्त व सक्रीयपणे सहभाग घ्यावा. याकरिता महसुली विभागस्तरावर ग्रामपंचायतींना प्राप्त गुणांकनाच्या आधारे काढलेल्या टक्केवारीनुसार सर्वाधिक गुण प्राप्त ३ पंचायत समितींची विभागस्तरीय अत्युत्कृष्ट पंचायत समिती म्हणून निवड करण्यात येईल.

(२) या विभागस्तरावरील अत्यत्कृष्ट प्रथम २ पंचायत समितींचे राज्यस्तरीय समितीमार्फत मुल्यमापन करून, सर्वाधिक गुण प्राप्त ३ पंचायत समितींची राज्यस्तरीय अत्युत्कृष्ट पंचायत समिती म्हणून निवड करण्यात येईल.

पंचायत समितीची वरिष्ठ स्तरावरील पुरस्कारासाठी निवड झाली असेल, त्या पंचायत समितीला वगळून यापूर्वीच्या पुरस्कारासाठी गुणांकनामध्ये त्या नंतरचे गुणांकन असणारी पंचायत समिती निवडीस पात्र राहील.



Scanned with OKEN Scanner

(३) राज्यस्तरावर ग्रामपंचायतींना प्राप्त गुणांकनाच्या आधारे काढलेल्या टक्केवारीनुसार सर्वाधिक गुण प्राप्त ३ जिल्हा परिषदांची राज्यस्तरीय अत्युत्कृष्ट जिल्हा परिषद म्हणून निवड करण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांना शासनाच्या वतीने पुरस्कार व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येईल. विभागीय व राज्यस्तरीय पुरस्कार मे महिन्यात मा.राज्यपाल व मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते मा. उपमुख्यमंत्री, मा. मंत्री (ग्रामविकास), मा. राज्यमंत्री (ग्रामविकास) यांच्या उपस्थितीत प्रदान केले जातील.

**९. क्षमता बांधणी व प्रशिक्षण:-**

१. जिल्हा स्तर नोडल अधिकारी, इतर अधिकारी/भागधारकांना हँडहोल्डिंग, क्षमता वृद्धी आणि प्रशिक्षण पूर्ण करण्यात येईल.

२. राज्य स्तर प्रविण प्रशिक्षक आणि विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल.

३. यशदा मार्फत स्थानिक भाषेत प्रशिक्षण मॉड्युल विकसित करण्यात येईल.

४. क्षमता बांधणी प्रशिक्षण राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा यांच्यामार्फत राबविण्यात येईल.

**१०.** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाबाबत जनजागृती/अभियानामध्ये लोकसहभाग वाढवण्याकरिता जास्तीत जास्त लोकांना प्रोत्साहित करणे/या कार्यक्रमाची जनतेस माहिती करून देणे/अंमलबजावणीचे समीक्षण करणे इत्यादी बाबत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विभागातील एका ग्रामीण पत्रकारास राज्यस्तरावर पुरस्कार देवून गौरविण्यात येईल.

अभियानास इन्स्टाग्राम, फेसबुक, युट्युब या ॲप्स वर व्यापक प्रसिद्धी देणाऱ्या ३ चॅनल/अकाउंट (बातम्या देणारे चॅनल्स वगळता) यांना राज्यस्तरावर पुरस्कार देवून गौरविण्यात येईल. अभियानाच्या कालावधीत यासंदर्भातील प्रसिद्धीकरिता इन्स्टाग्राम, फेसबुक, युट्युब यांचे एकत्रित यापैकी कोणत्याही एका माध्यमावर/ एकत्रित दोन माध्यमांवर/एकत्रित तिन्ही माध्यमांचे कमीतकमी एकूण १० लाख views असणारे चॅनल पात्र असतील. पुरस्कार मिळविण्यासाठी, पुरस्कारासाठी एकूण मिळालेले views चे अहवाल जे शासनास सादर करतील तेच पुरस्कारासाठी ग्राह्य धरले जातील. या दोन्ही पुरस्कारांबाबतच्या मार्गदर्शक सूचना स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

**११.** या अभियानाकरिता ग्रामपंचायत निहाय खाते, अभिलेख, छायाचित्रे व इतर तपशीलाचे जतन करण्यासाठी स्वतंत्र संकेतस्थळ निर्माण करण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

**१२.** मा. मंत्रिमंडळाने सदर अभियान यशस्वीरित्या राबविण्यासाठी महसूल विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, दिव्यांग कल्याण विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, नियोजन (रोजगार हमी) विभाग, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महिला व बाल विकास विभाग, मृद व जलसंधारण विभाग, कृषी,पशुसंवर्धन दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग, शालेय शिक्षण विभाग, सामाजिक न्याय विभाग, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग व इतर विभागांनी, त्या विभागाच्या अधिनस्त असणाऱ्या संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आवश्यक त्या ठिकाणी तत्परतेने सहकार्य करण्याचे निर्देश दिलेले असल्याने आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना द्याव्यात.

**१३. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हापरिषद यांच्यासाठी पुरस्काराचे स्वरूप व पुरस्काराची रक्कम शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "क" प्रमाणे आहे.**

**१४.** अभियान कालावधीत जास्तीत जास्त लोकांना सहभागी करून घेणे तसेच ग्रामपंचायतींना सहभागी करून घेण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर व्यापक प्रसिद्धी देणे आवश्यक आहे. याशिवाय क्षमता बांधणी, प्रशासकीय खर्च, प्रचार प्रसिद्धी, कार्यशाळा, प्रशिक्षण, मेळावे, यशोगाथा फिल्म, तांत्रिक सल्लागार इ. बाबींसाठी राज्यस्तरावर रु. २१.०० कोटी, प्रति जिल्हा रु. ४० लक्ष याप्रमाणे ३४ जिल्ह्यांसाठी रु. १३.६० कोटी व प्रति तालुका रु. ३ लक्ष याप्रमाणे रु. १०.५३ कोटी अशी एकूण रु. ४५.१३ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**१५. योजनेकरिता निधी/खर्च:-**

या योजनेकरिता दरवर्षी एकूण रु. २९०.३३ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदर खर्चाचे विवरण खालीलप्रमाणे राहील:-

| **अ.क्र.** | **विवरण** | **निधी रु. कोटी** |
|---|---|---|
| १. | पुरस्कार निधी तालुकास्तर | १५७.९५ |
| २. | पुरस्कार निधी जिल्हास्तर | ३४.०० |
| ३. | पुरस्कार निधी विभागस्तर | २८.५० |
| ४. | पुरस्कार निधी राज्यस्तर | २४.७५ |
| ५. | क्षमता बांधणी, प्रशासकीय खर्च, प्रचार प्रसिद्धी इ. (राज्यस्तर २१.०० कोटी+ प्रति जिल्हा ४०.०० लक्ष प्रमाणे ३४ जिल्ह्यांसाठी रु.१३.६० कोटी + प्रति तालुका रु.३.०० लक्ष प्रमाणे ३५१ तालुक्यांसाठी रु.१०.५३ कोटी) | ४५.१३ |
| | एकूण | **रु.२९०.३३ कोटी (रु.दोनशे नव्वद कोटी तेहतीस लक्ष)** |



Scanned with OKEN Scanner

उपरोक्त खर्च भागविण्यासाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्यास व या लेखाशीर्षाखाली निधी अर्थसंकल्पीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**१६.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०८०६१३२५४४५१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KALU GONYA VALVI

Digitally signed by KALU GONYA VALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=714701FC3DB9C38A46F4CD82E1E450B51A9E92EEDE8C323934F82EDB538D3B20, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8C5D0F275C3D9A21DB07FECF7919C2D83796E88930D62D44E7A4A6D4CBEE7E0E, cn=KALU GONYA VALVI
Date: 2025.08.06 17:43:32 +05'30'

**(का.गो.वळवी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्य मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई,
८. सर्व मा.विधानपरिषद/विधानसभा सदस्य,
९. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१०. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
११. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई,



Scanned with OKEN Scanner

१७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,

१९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई,

२०. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,

२१. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई,

२२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई,

२३. महालेखापरिक्षक (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१,२, मुंबई/नागपूर,

२४. महालेखापरिक्षक (लेखापरीक्षण), महाराष्ट्र राज्य-१,२, मुंबई/नागपूर,

२५. विभागीय आयुक्त, सर्व,

२६. जिल्हाधिकारी, सर्व,

२७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व,

२८. कार्यासन योजना-११ संग्रहार्थ.



Scanned with OKEN Scanner

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान
## अभियान अंतर्गत मोहीम कालावधीतील ग्रामपंचायतीसाठी प्रश्नावली

### परिशिष्ट अ

| अ.क्र. | अभियान कालावधी पर्यंत करावयाच्या कामाचा तपशील | उद्दिष्ट | साध्य | कार्यवाही स्वरूप | मोहीम कालावधी पर्यंत अपेक्षित उद्दिष्ट | | | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | २००० पर्यंत लोकसंख्या | २००० ते ५००० लोकसंख्या | ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या | |
| | **१) सुशासनयुक्त पंचायत (Good Governance)** | | | | | | | |
| १.१ | **लोकाभिमुख प्रशासन** -ग्रामपंचायत मार्फत दिल्या जाणाऱ्या सर्व सेवा ऑनलाइन पद्धतीने नागरिकांना सुलभ रित्या देणे (लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५ अंतर्गत ७ प्रकारचे दाखले तसेच www.dccrs.gov.in द्वारे जन्म व मृत्यू बाबतचे दाखले तसेच अन्य ऑनलाईन सेवा देणे) | प्राप्त अर्ज | निर्गत अर्ज | दि.०१ एप्रिल ते मोहीम कालावधीपर्यंत आलेले अर्ज व निर्गत अर्ज तसेच ऑनलाइन अहवाल तपासून त्या प्रमाणे गुण देणे. | १००% | १००% | १००% | १ |
| १.२ | **नागरी सेवा सुविधा केंद्र दर्जा** - ग्रामपंचायत कडील आपले सरकार सेवा केंद्र सक्षम करून त्यास नागरी सेवा सुविधा केंद्र दर्जा (सीएससी) मिळवणे. त्याद्वारे सर्व शासकीय कार्यालयातील सर्व प्रकारचे दाखले देणे. तसेच लोकोपयोगी B२C सेवा उपलब्ध करून देणे. (प्रामुख्याने सातबारा उतारा, खाते उतारा, प्रॉपर्टी कार्ड उतारा,फेरफार उतारा इत्यादी) | प्राप्त अर्ज | निर्गत अर्ज | ग्रामपंचायत कडील आपले सरकार सेवा केंद्र सक्षम करून नागरी सेवा सुविधा केंद्र दर्जा (सीएससी) मिळवणे. त्याद्वारे ग्रामस्थांना सेवा पुरवठा केली असल्यास त्यानुसार गुण देणे. | १००% | १००% | १००% | १.५ |
| १.३ | **तक्रार निवारण** - ग्रामपंचायत कडील प्राप्त झालेले सर्व सार्वजनिक स्वरूपाच्या तक्रारीचे विहित मुदतीत निवारण करणे. ग्रामपंचायत कार्यालयाच्या दर्शनी ठिकाणी तक्रार पेटीद्वारे | प्राप्त अर्ज | निर्गत अर्ज | ग्रामपंचायत कार्यालयाच्या दर्शनी ठिकाणी तक्रार पेटीद्वारे देखील तक्रार अर्ज संकलन करण्याची सुविधा ग्रामपंचायत मार्फत केलेली असली पाहिजे. | १००% | १००% | १००% | ०.५ |



Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | अभियान कालावधी पर्यंत करावयाच्या कामाचा तपशील | उद्दिष्ट | साध्य | कार्यवाही स्वरूप | मोहीम कालावधी पर्यंत अपेक्षित उद्दिष्ट | | | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | २००० पर्यंत लोकसंख्या | २००० ते ५००० लोकसंख्या | ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या | |
| | देखील तक्रार अर्ज संकलन करण्याची सुविधा ग्रामपंचायत मार्फत केलेली असली पाहिजे. | | | दि.०१ एप्रिल ते मोहीम कालावधीपर्यंत आलेले अर्ज व निर्गत अर्ज अहवाल तपासून त्या प्रमाणे गुण देणे अन्यथा शून्य गुण देणे. (ज्या गावातील पोलिस स्टेशनला एकही तक्रार गेलेली नाही त्या गावास पूर्ण गुण दयावेत.) | १००% | १००% | १००% | ०.५ |
| १.४ | **ग्रामपंचायत वेबसाईट** - ग्रामपंचायत ची वेबसाईट अद्ययावत करुन ग्रामपंचायतीची सर्व माहिति प्रसिध्द करणे (सर्व साधारण माहिती , ग्रामपंचायत वितरीत सर्व सेवा ,सर्व निधी जमाखर्च, हाती घेतलेली कामे,पूर्ण झालेली कामे) व माहिती अधिकार कायद्यान्वये प्रसिद्ध करावयाची माहिती दर्शनी भागावर व ग्रामपंचायत वेबसाईटवर प्रसिद्ध करणे. | वेबसाईटवर माहिति प्रसिध्द करणे | | ग्रामपंचायतची वेबसाईट तयार करणे. | १००% | १००% | १००% | ०.५ |
| | | | | वेबससाईटवर सर्व माहिति प्रसिध्द करणे व अद्यावत करणे. | १००% | १००% | १००% | ०.५ |
| १.५ | **CCTV बसवणे** - ग्रामपंचायत एकूण कार्यक्षेत्रात CCTV /CCTV द्वारे ग्रामपंचायत क्षेत्रात संरक्षण कारणास्तव नियंत्रण ठेवणे व उपाय योजना करणे | ग्रामपंचायतीतील एकूण किती टक्के कार्यक्षेत्रात CCTV स्थापित करुन त्याद्वारे संरक्षणासाठी नियंत्रण ठेवले जाते त्या प्रमाणात गुण देणे. | | | १००% | ९०% | ८०% | १ |
| १.६ | **दफ्तर अद्ययावत व लेखापरिक्षण करणे** - ग्रामपंचायत अंतर्गत नमुना नं.१ ते ३३ व इतर आवश्यक नोंदवह्या अद्ययावत ठेवणे व पंचायतीचे लेखा परीक्षण होऊन सदर लेखापरीक्षण अहवालाची ग्रामपंचायतीने पूर्तता करून शक अहवाल अंतीम स्वीकृती १०० % असणे. | ग्रामपंचायतीकडील संपूर्ण दफ्तर अद्यावत असावे | | ग्रामपंचायत कडील दफ्तर अद्ययावत करणे | १००% | १००% | १००% | १ |
| | | एकूण शक संख्या | मंजूर शक संख्या | लेखापरिक्षण शकपूर्तता करणे. शकपूर्तता अहवाल तपासून गुण देणे. लेखापरीक्षण शक १०० % मंजुरी असल्यास १ गुण देणे. | १००% | १००% | १००% | १ |



Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | अभियान कालावधी पर्यंत करावयाच्या कामाचा तपशील | उद्दिष्ट | साध्य | कार्यवाही स्वरूप | मोहीम कालावधी पर्यंत अपेक्षित उद्दिष्ट | | | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | २००० पर्यंत लोकसंख्या | २००० ते ५००० लोकसंख्या | ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या | |
| १.७ | **ग्रामपंचायत सर्व सभा व कार्यवृत्तांत नोंदवही अद्ययावत करणे** - ग्रापं अधिनियमा नुसार मासिक सभा,महिला सभा, वॉर्डसभा व ग्रामसभा नियमितपणे घेणे व त्यांचे दप्तर अद्यावत ठेवणे. सभांची नोंद पोर्टल वर घेणे तसेच महिला सभा व ग्रामसभा व्हिडीओ शुटींग घेणे (पेसा ग्रामपंचायतीसाठी पेसा अधिनियम लागू राहतील) | दि.१ एप्रिलपासून मोहीम कालावधीपर्यंत ग्रामपंचायत कडील एक ही सभा तहकूब झालेली नसावी | | ग्रामपंचायत कडील सर्व सभा कामकाज व त्याचे कार्यवृत्तांत नोंदवही अद्ययावत असल्याचे पाहून प्रत्येक सभा प्रकारासाठी ०.२५ गुण देय असेल. ऑनलाईन अहवाल तपासून त्या प्रमाणे गुण देणे अन्यथा शून्य गुण | १००% | १००% | १००% | १ |
| १.८ | **ग्रामविकास समिती कामकाज** - शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना व ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदीनुसार (कलम ४९) ग्राम विकास समित्या कार्यरत असणे (ग्राम आरोग्य पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, कृषि विकास समिती,शाळा व्यवस्थापन समिती, बाल हक्क सरंक्षण समिती, जैव विविधता समिती इ.,) | दि.१ एप्रिल पासून मोहीम कालावधीपर्यंत ग्रामपंचायत कडील ग्राम विकास समितीची एक ही सभा तहकूब झालेली नसावी. | | ग्रामपंचायत कडील ग्रामविकास समित्यांचे दस्तऐवज तपासून किमान चार समित्या गठीत केल्या असल्यास सभा इतिवृत्त नोंदवही अद्ययावत ठेवले असल्यास प्रत्येकी ०.२५ गुण देणे | १००% | १००% | १००% | १ |
| १.९ | **मतदार/नागरिकांनी ॲप डाऊनलोड करणे** - शासनाच्या वतीने पारदर्शकतेसाठी लॉंच करण्यात आलेल्या विविध ॲपपैकी **अ)** मेरी पंचायत **ब)** पंचायत निर्णय व **क)** ग्रामसंवाद या ॲपबाबत प्रचार व प्रसिध्दी करुन मतदार/नागरिकाकडे किमान एकतरी ॲप डाऊनलोड असणे. | एकूण मतदार संख्या | पैकी किती मतदारांनी किमान एक तरी ॲप डाऊनलोड करून घेतले आहे | मतदार संख्येच्या उद्दिष्टानुसार ॲप डाऊनलोड केलेल्या मतदारांच्या प्रमाणात गुण देणे. | ५०% | ४०% | ३०% | १ |
| १.१० | **आयुष्यमान भारत कार्ड** - केंद्र व राज्य शासनाच्या आयुष्यमान भारत कार्ड या योजनेचे लाभ सर्व पात्र लाभार्थींना मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणे | एकूण पात्र लाभार्थी | पैकी कार्ड मिळालेले लाभार्थी | ग्रामपंचायत क्षेत्रातील पात्र लाभार्थीपैकी किती लाभार्थ्यांना कार्ड दिले त्याप्रमाणात गुण | १००% | १००% | १००% | २ |
| | | कार्ड धारकापैकी | त्यापैकी लाभ | आजारी पडलेल्या किती लाभर्थ्यांना | ९०% | ८५% | ८०% | १ |



Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | अभियान कालावधी पर्यंत करावयाच्या कामाचा तपशील | उद्दिष्ट | साध्य | कार्यवाही स्वरूप | मोहीम कालावधी पर्यंत अपेक्षित उद्दिष्ट | | | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | २००० पर्यंत लोकसंख्या | २००० ते ५००० लोकसंख्या | ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या | |
| | | आजारी पडलेले लाभार्थी | मिळालेले लाभीर्थी | योजनेचा लाभ दिला. त्याप्रमाणात गुण देणे. | | | | |
| १.११ | **अनिवार्य बाबींवरील तरतूद व खर्च** - ग्रामपंचायतीने बजेटनुसार ग्रामपंचायत कडील दिव्यांग कल्याण, महिला व बालकल्याण तसेच मागासवर्गीय कल्याणावर अनुक्रमे ५ %, १०% व १५% तरतूद करणे व १००% खर्च करणे | केलेली तरतूद | झालेला खर्च | तपशील | | | | |
| | | | | १. दिव्यांग कल्याण ५ % | १००% | १००% | १००% | ०.५ |
| | | | | २. महिला व बालकल्याण १०% | १००% | १००% | १००% | ०.५ |
| | | | | ३. मागासवर्गीय कल्याण १५% | १००% | १००% | १००% | ०.५ |
| १.१२ | **दिव्यांग ओळखपत्र** - सर्व पात्र दिव्यांगांना ओळख पत्र मिळवून देणे | एकुण पात्र दिव्यांग लाभार्थी संख्या | पैकी कार्ड वितरीत केलेले दिव्यांग लाभार्थी संख्या | ग्रामपंचायत क्षेत्रातील एकुण पात्र दिव्यांग लाभार्थीपैकी १००% दिव्यांग लाभार्थींना ओळखपत्राचा लाभ मिळवून दिलेला असावा. | १००% | १००% | १००% | १ |
| | | | | | | | | **१६** |
| | | | | **२) सक्षम पंचायत (स्वनिधी व लोकवर्गणी)** | | | | |
| २.१ | **कर व पाणीपट्टी वसुली** - मोहीम कालावधीपर्यंत ग्रामपंचायतकडील घरपट्टी व पाणीपट्टी व इतर करांची चालू थकबाकी वसुली करणे, त्यासाठी QR code तयार करणे. | एकूण कर मागणी | मोहीम कालावधी पर्यंत झालेली वसुली | घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीसाठी क्युआर कोडचा/ऑनलाइन सिस्टीमचा वापर- वसुली प्रमाणात गुणदेय | | | | १ |
| | | | | घर पट्टी कराच्या थकबाकीची वसुली | ९०% | ८०% | ७०% | २ |
| | | | | घर पट्टी चालू वर्षीच्या मागणीप्रमाणे कर वसुली | १००% | ९०% | ८०% | २ |
| | | | | पाणी पट्टी थकबाकीची वसूली | ९०% | ८०% | ७०% | १ |
| | | | | पाणी पट्टी चालु मागणी वसूली | १००% | ९०% | ८०% | १ |
| २.२ | **लोकवर्गणी** - लोकवर्गणी मधून निधी उपलब्ध करुन घेणे व सदर निधी मधून लोकोपयोगी सोयी सुविधा उपलब्ध करून देणे | मोहीम कालावधी पर्यंत प्रति एक हजार लोकसंख्येस रु. दोन लक्ष या प्रमाणात लोकसंख्या विचारात घेऊन लोक वर्गणीचे उदिष्ट निश्चित करावे. उदिष्ट साध्याच्या प्रमाणात गुण देणे. तसेच उदिष्टापेक्षा अधिक लोकवर्गणी गोळा झाल्यास त्याचा विचार नाविन्यपुर्ण बाबीमध्ये विचार करण्यात येईल. | | | | | | |



Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | अभियान कालावधी पर्यंत करावयाच्या कामाचा तपशील | उद्दिष्ट | साध्य | कार्यवाही स्वरूप | मोहीम कालावधी पर्यंत अपेक्षित उद्दिष्ट | | | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | २००० पर्यंत लोकसंख्या | २००० ते ५००० लोकसंख्या | ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या | |
| | | दि.०१ एप्रिल पासून मोहीम कालावधी पर्यंत ग्रामपंचायती कडे जमा झालेला लोकवर्गणी निधी | | लोकसंख्येनुसार लोकवर्गणीतून निधी जमा झाल्यास त्याप्रमाणात गुण अनुज्ञये | १००% | १००% | १००% | १ |
| | | लोकवर्गणी माध्यमातून नाविन्यपूर्ण लोकोपयोगी सुविधा निर्माण झालेली असेल तरच पूर्ण गुण देय राहतील | | | | | | १ |
| २.३ | **स्वउत्पन्न** (OSR) - मोहीम कालावधीत ग्रामपंचायतीकडे गाळा, दुकानभाडे,जाहिराती, मोबाईल टॉवर भाडे व अवजारे बँक इ. यातून स्वउत्पन्न असणे व त्याची वसुली करणे | एकूण मागणी | मोहीम कालावधी पर्यंत झालेली वसुली | ग्रामपंचायत दस्तऐवज तपासून किमान उद्दिष्ट्य लोकसंख्या गट निहाय नमूद करण्यात आले आहे त्या प्रमाणे असल्यासच पूर्ण गुण देणे. | १००% | ९०% | ८०% | १ |
| | | | | | | | | **१०** |
| | **३) जल समृध्द, स्वच्छ व हरित गाव (Climate Action)** | | | | | | | |
| ३.१ | **पाण्याचा ताळेबंद** - लोकसहभागातून पाण्याचा ताळेबंद (वॉटर बजेट) तयार करुन पाणी व्यवस्थापन आराखडा तयार करणे | ग्रामपंचायतीने जनजागृती, शिवार फेरी, इत्यादी उपक्रमातून लोकसहभागातून पाण्याचे ताळेबंद तयार करुन दर्शनीभागात लावणे. | | | १००% | १००% | १००% | १ |
| ३.२ | **शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा** - गावातील सर्व कुटुंबांना नळाद्वारे शाश्वत शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे **FHTC (Functional Housing Tap Connection)** | एकूण कुटुंब संख्या | पैकी FHTC नळ कनेक्शन व नळाद्वारे शुध्द पाण्याचा पुरवठा असलेले कुटुंब संख्या | गावातील एकुण कुंटुंबापैकी किती कुंटुंबांना वैयक्तीक नळ **FHTC** कनेक्शन दिले त्याप्रमाणात गुण देणे. कार्यरत घरगुती नळ जोडणी | १००% | १००% | १००% | १ |
| ३.३ | **विद्युत देयके** - ग्रामचायंत नळ पाणी पुरवठा योजना व रस्त्यावरील दिवाबत्ती वीज देयकांचा नियमित भरणा करणे व थकबाकी शून्य असणे | एकूण देयकाची रक्कम | भरणा केलेली रक्कम | ग्रामचायंत नळ पाणी पुरवठा योजना वीज देयकांचा नियमित भरणा करुन थकबाकी शून्य असेल तर पूर्ण गुण देणे. अन्यथा अभियान कालावधीत थकबाकी भरणा केल्याच्या प्रमाणात गुण देणे. | १००% | ९०% | ८०% | १ |



Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | अभियान कालावधी पर्यंत करावयाच्या कामाचा तपशील | उद्दिष्ट | साध्य | कार्यवाही स्वरूप | मोहीम कालावधी पर्यंत अपेक्षित उद्दिष्ट | | | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | २००० पर्यंत लोकसंख्या | २००० ते ५००० लोकसंख्या | ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या | |
| | | | | रस्त्यावरील दिवाबत्ती वीज देयकांचा नियमित भरणा करणे व थकबाकी शून्य असेल तर पुर्ण गुण देणे. अन्यथा प्रमाणात गुण देणे . | १००% | ९०% | ८०% | १ |
| ३.४ | **पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकटीकरण** - गाव क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकटीकरण करण्यासाठी तलाव, नदी, नाले पुनर्जिवित करणे संवर्धन करणे व पाण्याचा कार्यक्षम वापर करणे, जल स्त्रोत संवर्धनासाठी वनराई बंधारे तयार करणे, सिमेंट बंधारे व केटी वेअर यांचे गेट बसविणे | गावातील एकूण पिण्याच्या पाण्याचे स्त्रोतांची संख्या | त्यापैकी स्त्रोत बळकटीकरण केलेल्या स्त्रोतांची संख्या | खात्री करुन १००% स्त्रोतांचे बळकटीकरण केल्यास पूर्ण गुण देणे. | १००% | १००% | १००% | १ |
| ३.५ | **रेन वॉटर हार्वेस्टिंग युनिट** - गावातील सर्व शासकीय व निमशासकीय संस्था यामध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग युनिट स्थापित करणे. | शासकीय व निमशासकीय इमारत संख्या | पैकी RWH स्थापित इमारत संख्या | ग्रामपंचायत क्षेत्रातील शासकीय व निमशासकीय संस्था रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रगतीनुसार गुण देणे. | १००% | १००% | १००% | १ |
